#MahaMarathon /MahaMarathon
नाशिकसाठी एक महासंधी महाध्येय साधायची!
8 ऑक्टोबर 2017
स्पर्धा
Family Run - 3 Kms
Fun Run - 5 Kms
Power Run - 10 Kms
Half Marathon - 21 Kms
Registrations Open नोंदणी सुरु
लोकमत
Nashik Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
8 ऑक्टोबर 2017
नोंदणीसाठी www.mahamarathon.com/nashik/
नोंदणीसाठी पत्ता :
लोकमत मीडिया प्रा. लि., सुयोजित ट्रेड सेंटर, शरणपूररोड, नाशिक. फोन-६६४७५२६

### महामॅरेथॉन स्पर्धा : लोकमत समूहातर्फे आयोजित स्पर्धेच्या नावनोंदणीस प्रतिसाद

# सहभागी स्पर्धकांना मिळणार आकर्षक भेटवस्तू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी, तसेच अॅथलिट क्रीडा प्रकाराला चालना मिळावी, या हेतूने लोकमत वृत्त समूहातर्फे नाशिकसह औरंगाबाद, कोल्हापूर आणि नागपूर येथे 'महामॅरेथॉन'चे आयोजन करण्यात आले आहे. नाशिकमध्ये रविवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

२१ कि.मी., १० कि.मी., ५ कि.मी. फन रन आणि ३ कि.मी. फॅमिली रन अशा विविध गटात ही मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. नाशिक जिल्ह्याने आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत यश संपादन करणारे धावपटू दिले आहेत. विविध संस्था, संघटनातर्फे नाशकात प्रतिवर्षी मॅरेथॉन घेऊन या क्रीडा प्रकाराला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न केले जात असतात, याच पार्श्वभूमीवर 'लोकमत'नेही पुढाकार घेऊन ८ ऑक्टोबर रोजी मॅरेथॉनचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या धावपटूंना नोंदणी केल्यानंतर आकर्षक टी शर्टसह विविध भेटवस्तू देण्यात येणार असून, या स्पर्धेसाठी शुक्रवार (दि. २२) पर्यंत नावनोंदणी केल्यास प्रवेश शुल्कात सवलतदेखील मिळणार आहे.

तीन कि.मी. फॅमेली रनमध्ये दोन प्रौढ व्यक्तींसह १२ वर्षांखालील लहान मुलांना सहभागी होता येणार असून, यासाठी १२०० रुपये प्रवेश फी (सवलतीत ९६० रुपये) आकारण्यात येणार असून, यात एक 'गुडी बॅग', सहभाग प्रमाणपत्र, सहभाग सन्मान चिन्ह आणि नाश्ता यांचा समावेश आहे. पाच कि.मी. फन रनमध्ये १२ वर्षांपुढील स्पर्धकांना सहभागी होणार असून, यासाठी ६०० रुपये प्रवेश फी (सवलतीत ४८० रुपये) आकारण्यात येणार असून, यात आकर्षक टी शर्ट, 'गुडी बॅग', सहभाग प्रमाणपत्र, सहभाग सन्मानचिन्ह आणि नाश्ता, १० कि.मी. रनमध्ये १६ वर्षांपुढील स्पर्धकांना सहभागी होता येणार असून, यासाठी ९५० रुपये प्रवेश फी (सवलतीत ७६० रुपये) आकारण्यात येणार असून, यात आकर्षक टी शर्ट, 'गुडी बॅग', सहभाग प्रमाणपत्र, सहभाग सन्मानचिन्ह, 'टायमिंग चीप' आणि नाश्ता यांचा समावेश आहे. २१ कि.मी. रनमध्ये २१ वयोगटापुढील स्पर्धक आणि लष्करी सेवेतील कमचाऱ्यांनासुद्धा सहभागी होता येणार आहे. यासाठी १२०० रुपये प्रवेश फी (सवलतीत अनुक्रमे ९६० रुपये आणि ८०० रुपये) आकारण्यात येणार असून, यात आकर्षक टी शर्ट, 'गुडी बॅग', सहभाग प्रमाणपत्र, सहभाग सन्मानचिन्ह, 'टायमिंग चीप', बिब आणि नाश्ता यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना ऑफलाइन तसेच ऑनलाइन पद्धतीने नावनोंदणी करता येणार असून, अधिकाधिक धावपटूंनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## असा असणार आहे स्पर्धेचा मार्ग

- तीन कि.मी. फॅमिली रन : गोल्फ क्लब मैदान, मायको सर्कल, ग्रीन व्ह्यू हॉटेल सिग्नल मार्गे पुन्हा गोल्फ क्लब मैदान.
- पाच कि.मी. रन : गोल्फ क्लब मैदान, मायको सर्कल, एबीबी सर्कलमार्गे पुन्हा गोल्फ क्लब मैदान.
- १० कि.मी. रन : गोल्फ क्लब मैदान, मायको सर्कल, एबीबी सर्कल, महात्मानगरमार्गे जेहान सर्कल, विद्या विकास सर्कल, डोंगरे वसतिगृह चौक, अशोकस्तंभ सर्कल, मेहेर चौक, त्र्यंबक नाका मार्गेगोल्फ क्लब मैदान.
- २१ कि.मी. हाफ मॅरेथॉन : गोल्फ क्लब मैदान, मायको सर्कल, एबीबी सर्कल त्र्यंबक रोडमार्गे हॉटेल संस्कृती (महिरावणी) पुन्हा याच मार्गावरुन गोल्फ क्लब मैदान येथे या स्पर्धेची सांगता होणार आहे.

## ६ लाखांपर्यंत पारितोषिके

- 'महामॅरेथॉन' स्पर्धेअंतर्गत विविध गटातील पहिल्या सत्तर स्पर्धकांना रुपये सहा लाखांपर्यंतची पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, तसेच दहा कि.मी. आणि अर्ध मॅरेथॉन पूर्ण करणाऱ्या पहिल्या दहा स्पर्धकांना मेरिट सर्टिफिकेट, स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक धावपटूला आकर्षक मेडल, टायमिंग सर्टिफिकेट आणि 'डिफेन्स कप' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.


- आपल्या ग्रुपलाही 'नाशिक महामॅरेथॉन' स्पर्धेसाठी सहभागी व्हायचे असल्यास ८९९९५३५३०६ या क्रमांकावर फोन करा.
- स्पर्धेच्या नावनोंदणीसाठी www.mahamarathon.com/nashik या संकेतस्थळावर भेट द्या.
- 'नाशिक महामॅरेथॉन' स्पर्धेबद्दल आपणास असलेल्या विविध शंका तसेच सूचना asknashik@mahamarathon.com या मेल आयडीवर मेल करा.



लोकमत समूहातर्फे आयोजित महामॅरेथॉन स्पर्धेअंतर्गत सहभाग नोंदविताना जैन जॉगर्स क्लबचे सदस्य.



महामॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करताना विंग कमांडर प्रदीप बागमार, मदन पारख. समवेत लोकमतचे सहाय्यक उपाध्यक्ष बी. बी. चांडक.



> औषधाविना जीवन जगण्यासाठी तसेच हृदयविकाराला दूर ठेवण्यासाठी धावणे हा सर्वोत्तम व्यायाम प्रकार आहे. शास्त्रीय पद्धतीने धावल्यास निश्चितच फायदेशीर ठरणार आहे. या स्पर्धेमुळे अनेक खेळाडू पुढे येण्यास मदत होणार आहे. नाशिक हेल्दी होण्यासाठी नाशिककरांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे.
>
> **- विजेंदर सिंग,** प्रशिक्षक



> नाशिक शहरात विविध क्रीडा प्रकारातून अनेक खेळाडू पुढे येत आहेत ही आनंदाची बाब असून, महामॅरेथॉन स्पर्धेमुळे अनेक धावपटूंना व्यासपीठ मिळणार आहे. नाशिककरांनी फिटनेसचे महत्त्व ओळखून या स्पर्धेत सहभागी व्हावे. जिल्ह्यातील जॉगर्सने सुद्धा या स्पर्धेत सहभागी व्हावे.
>
> **- कविता राऊत,** आंतरराष्ट्रीय धावपटू



> लोकमत तर्फे आयोजित महामॅरेथॉन हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून, या स्पर्धेमुळे अनेक खेळाडूंमध्ये आवड निर्माण होणार आहे. आपल्या जिल्ह्यातून आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे प्रतिनिधित्व केलेले धावपटू सहभागी होणार असल्याने धावपटूंमध्ये उत्साह संचारला आहे.
>
> **- मोनिका आथरे,** आंतरराष्ट्रीय धावपटू



> नाशिकचे वातावरण धावण्यासाठी पोषक असून, आम्ही धावपटू याच भूमीत नियमित सराव करून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश मिळविले आहे. स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर नियमित सराव सुरु असून, नाशिककरांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे.
>
> **- संजीवनी जाधव,** आंतरराष्ट्रीय धावपटू



> आगामी महिन्यात होऊ घातलेल्या महामॅरेथॉन स्पर्धेत आवश्यक सहभागी होणार असून, याद्दष्टीने नियमित सरावदेखील सुरु आहे. नुकत्याच चीन येथे झालेल्या वर्ल्ड युनिव्हर्सिटी स्पर्धेचा अनुभव पाठीशी असल्याने या स्पर्धेत चांगली कामगिरी करण्याचा विश्वास आहे.
>
> **- किसन तडवी,** आंतरराष्ट्रीय धावपटू

FOOD & BEVERAGE PARTNER
Frut-X Fortune Foods
HOSPITALITY PARTNER
Express Inn The Business Luxury Hotel - Nashik www.expressinnindia.com A Division of Shelar Properties Pvt. Ltd.
PRIDE PARTNER
Looking beyond... Fravashi International Academy
Sapkal Knowledge Hub
HEALTH PARTNER
Apollo Hospitals Touching Lives Nashik